श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय
फुलंब्री जि. औरंगाबाद

# मराठी विभाग

# वार्षिक अहवाल

शै. वर्ष :- २०१८-१९

प्रमुख
डॉ. प्रा. राजश्री पवार

प्राचार्य
डॉ. एस. आर ़टकले

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
## मराठी विभाग
## अहवाल : २०१८-१९

**अभ्यागत तासिका:-**

दिनांक ०१/१०/२०१८ रोजी श्रीमती उषा दांडगे (सहशिक्षिका, श्री संत सावता गुरुकुल, फुलंब्री) यांनी प्रथम वर्षातील बी. ए. च्या वर्गावर काव्यात्म साहित्यातील केशवसुतांची नवा शिपाई या कवितेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच दि. ११/०२/२०१९ रोजी श्रीमती ललिता वाणी यांच्या अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी प्रथम वर्षातील द्वितीय भाषेतील बालकवींची निर्झरास या कवितेचे अध्यापन केले.

**भित्तीपत्रक:-**

दिनांक ०१/१०/२०१८ रोजी श्रीमती उषा दांडगे (सहशिक्षिका, श्री संत सावता गुरुकुल, फुलंब्री) यांच्या हस्ते माध्यमातंर या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच दि. २७/०२/२०१९ रोजी श्रीमती प्रा. रेखा मेश्राम (राजषी शाहू महाविद्यालय, पार्थी) यांच्या हस्ते मराठीतील प्रथम या विषयावर आधारीत भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

**अभ्यास सहल:-**

दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी भाषा विषयाची अभ्यास सहल चौका येथील लोकुत्तर बुद्ध विहार येथे ओयाजित करण्यात आली. या सहलीमध्ये विद्यार्थ्यांना तेथील प्रभारी भिक्खूनी बुद्धांच्या जातककथेविषयी मार्गदर्शन केले. पाली व मराठी भाषेचा अनुबंध उलगडून दाखविला. या सहलीमध्ये एकूण ४२ विद्याथ्यांनी सहभाग नोंदविला.

**मराठी भाषा सप्ताह:-.**

दिनांक २१ ते २६ फेब्रुवारी २०१९ या दरम्यान **मराठी भाषा सप्ताह** पाळण्यात आला. यानिमित्ताने **सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, काव्यवाचन, वत्कृत्व स्पर्धांचे** आयोजन करण्यात आले.

**स्पर्धेचे निकाल पुढील प्रमाणे आहेत.**

**काव्यवाचन -**

प्रथम - **अश्विनी बारवाल** (बी.एस्सी. द्वितीय वर्ष)

द्वितीय - **दिपाली बोलकर** (बी. ए. द्वितीय वर्ष)

**हस्ताक्षर -**

प्रथम - **दिपाली बोलकर** (बी. ए. द्वितीय वर्ष)

द्वितीय - **सीमा जाधव** (बी. ए. द्वितीय वर्ष)

**वक्तृत्व -**

प्रथम- **लक्ष्मीकांत ढेपल** (बी.कॉम तृतीय वर्ष)

द्वितीय - **कु. ज्योती उदे** (बी.ए. तृतीय वर्ष)

**मराठी भाषा गौरव दिन:-**

दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी **मराठी भाषा गौरव दिन** मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. रेखा मेश्राम (राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री) ह्या होत्या. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. रमाकांत देसाई (योगशिक्षक, पतंजली योग समिती, औरंगाबाद) हे होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर होते. या दिवशी परिसरातील महिलांना महाविद्यालयात निमंत्रित करून त्यांच्या कडून उखाणे, म्हणी, गाणी म्हणवून घेण्यात आले व त्याचे संकलन करण्यात आले. यामध्ये २५ महिला सहभागी झाल्या होत्या.

**पी.पी.टी. तासिका:-**

वर्षभरात एकूण १६ पी. पी.टी तासिका घेण्यात आल्या.

प्रा. पवार आर. पी.
(प्रमुख, मराठी विभाग)

# अभ्यागत तासिका 2018-19




अभ्यागत तासिका घेताना श्रीमती उषा दांडगे
(01.10.2018)




अभ्यागत तासिका घेताना श्रीमती ललिता वाणी
(दि. (11.02.2019)

भित्तीपत्रक 2018-19



दि. 01.10.2018 रोजी श्रीमती उषा दांडगे यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.




दि. 27.02.2019 रोजी श्रीमती रेखा मेश्राम यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

अभ्यास सहल 2018-19




दि: 23.01.2019 रोजी लोकुत्तर बुद्ध विहार येथे आयोजित अभ्यास सहलीत सहभागी विद्यार्थी




भंते यांच्याशी संवाद साधताना विद्यार्थी

मराठी भाषा सप्ताह 2018-19
(दि. 21-28 Feb 2019)



मराठी भाषा सप्ताह निमित्त काव्यवाचन स्पर्धा



मराठी भाषा सप्ताह निमित्त वक्तृत्व स्पर्धा

# मराठी भाषा गौरव दिन
(दि. 27 Feb 2019)



मराठी भाषा गौरव दिनानिमित्त व्याख्यान देताना श्रीमती प्रा. रेखा मेश्राम




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त म्हणी व वाक्प्रचार सादर करताना परिसरातील महिला




मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उखाणे सांगताना महिला